शालेय स्तरावर पर्यावरण सेवा योजना
राबविण्याबाबत

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र. इएनव्ही २०१०/प्र.क्र.८/तां.क.३
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक : २९ सप्टेंबर २०११

**प्रस्तावना**

पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्व शालेय स्तरावर बालवयात विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबविण्यासाठी राज्य शासनाने दि.१४-१-२०११ रोजी शासन निर्णयांद्वारे राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये "पर्यावरण सेवा योजना" (Environmental Service Scheme) राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेच्या माध्यमातून योजनेत सहभागी शाळांमध्ये आठवडयातील एक दिवस निवडून शाळांच्या तासांव्यतिरिक्त तीन तास निसर्गाच्या सांनिध्यात प्रत्यक्ष कृतीवर आधारित पर्यावरण संवर्धन व जनजागृतीचा कार्यक्रम राबविणे अपेक्षित आहे. प्रत्यक्ष सहभागातून काम करताना मुलांच्या मनात जागृती व चैतन्य निर्माण करुन पर्यावरण संवर्धनासाठी भविष्यात आधारस्तंभ तयार करणे, या योजनेद्वारे साध्य होणे अपेक्षित आहे.

२ सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE) या राज्य संनियंत्रण संस्थांवर पर्यावरण सेवा योजनेसाठी दि. १४-१-२०११ च्या शासन निर्णयातील तरतुदींच्या आधारे इच्छुक शाळांची निवड करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यानुसार सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE) या संस्थेने शासन निर्णयातील तरतुदींमध्ये ठरविलेल्या निकषांच्या आधारे राज्यातील प्रत्येक महसूली विभागातील प्रत्येकी दोन प्रमाणे १२ जिल्हयातील एकूण ५० इच्छुक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची प्राथमिक निवड करुन निवड केलेल्या शाळांची यादी मान्यतेसाठी पाठविलेली होती व त्यास मान्यता देणे शासनाच्या विचाराधीन होते. तसेच शासन निर्णयातील निकषाप्रमाणे सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE) यांनी या योजनेंतर्गत निवडलेल्या शाळांना पर्यावरण संवर्धन, प्रकल्प निवडणे, राबविणे इ. मध्ये सहाय्य करण्यासाठी पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असलेल्या सेवाभावी इच्छुक अशासकीय संस्थांची यादी सुध्दा मान्यतेसाठी पाठविलेली आहे.

**शासन निर्णय:**

महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये प्रथमत: राज्यातील प्रत्येक महसूली विभागातील प्रत्येक याप्रमाणे १२ जिल्हयातील एकूण ५० निवडलेल्या इच्छुक शाळांची यादी सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' येथे दर्शविण्यात आली असून या शाळांना त्यांनी दाखविलेल्या स्वेच्छेप्रमाणे व या योजनेच्या निकषात बसत असल्याने पर्यावरण सेवा योजनेखाली समावेश करण्याबाबत शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. या निवडलेल्या शाळांना त्यांच्या सभोवतालच्या परिसरातील जनतेच्या सहभागाने परिसरात पर्यावरण प्रकल्प निवडणे, निवडलेल्या प्रकल्पांची अंमलबजावणी आराखडा तयार करणे, त्यासाठी मार्गदर्शन करणे, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE) द्वारा योजनेच्या यशस्वीरित्या अंमलबजावणीत मदत करणे इ. साठी जिल्हानिहाय सेवाभावी अशासकीय संस्थांची सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE) यांनी निकषाप्रमाणे सुचित केलेल्या प्रपत्र 'ब' मधील संस्थांना या योजनेद्वारे त्यांच्या इच्छेनुसार मदत करण्यास शासन मान्यता देत आहे. या संस्थांना या कामासाठी शासनामार्फत आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

३. निवडलेल्या शाळा या योजनेतील खालील उदीष्टांची पूर्तता करतील :-

३.१ स्थानिक पर्यावरणाशी निगडीत समस्या, प्रत्यक्ष सहभाग व कृतीच्या आधारे समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यास प्रोत्साहन देणे

३.२ निसर्ग व मानव यांच्यातील नातेसंबंध समजून घेऊन ते जोपासण्याचे महत्व बालवयातच बिंबविणे

३.३ पर्यावरणविषयक कृती, प्रतिनिधीत्व व संवादकौशल्य या बाबी विकसित करणे,

३.४ शाश्वत विकासासाठी आवश्यक आचार-विचारांचे आदान-प्रदान, जडणघडण करणे व त्याद्वारे पर्यावरण संवर्धनासाठी नेतृत्वगुण विकसित करणे,

३.५ स्थानिक पातळीवर नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनाबाबत, स्थानिक लोकांच्या सहभागाने प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविणे.

४. <u>शालेय स्तर</u>: वर निवडलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये या योजनेअंतर्गत उपक्रम राबविण्यासाठी उपलब्ध शिक्षकांमधून मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्याद्वारे एका शिक्षकाची योजनाप्रमुख म्हणून नेमणूक केली जाईल. निवडलेल्या शालेय स्तरावरील योजनाप्रमुखाला प्रशिक्षणाला पाठविले जाईल. शाळांचे मुख्याध्यापक / प्राचार्य शाळास्तरावर या योजनेच्या दैनंदिन कामावर देखरेख व संनियंत्रण ठेवतील. या योजनेच्या शालेय स्तरावरील अंमलबजावणीची जबाबदारी मुख्याध्यापक / प्राचार्य यांची असेल. योजनाप्रमुख शिक्षक या योजनेच्या दैनंदिन कामासाठी जबाबदार असतील.

४.१ जिल्हा/तालुका स्तरावर नेमून दिलेली अशासकीय संस्था या योजनेच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवून वेळोवेळी या योजनेच्या यशस्वीतेसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य शाळांना व सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE) ला करेल.

४.२ तालुका शिक्षण अधिकारी व गट शिक्षण अधिकारी प्रत्यक्ष शाळेच्या संपर्कात राहून या योजनेच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवतील. योजनेची ध्येयपूर्तता होण्याच्या दृष्टीने सहाय्य व संनियंत्रण करतील. याबाबत शाळेच्या प्रगतीचा त्रैमासिक अहवाल जिल्हाशिक्षणाधिकारी, जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना पाठवतील.

४.३ जिल्हा स्तरावर नेमून दिलेली अशासकीय संस्था, योजनेचा आढावा घेऊन सदर अहवाल राज्यस्तरीय अंमलबजावणी करणाऱ्या संनियंत्रण संस्थेमार्फत पर्यावरण विभागाला सादर करेल.

४.४ शाळेचे मुख्याध्यापक व जिल्हा शिक्षण अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी या योजनेचा आढावा घेऊन, शाळेने दिलेला अहवाल सचिव, पर्यावरण विभाग यांना सादर करतील.

५. **गटाची रचना-**

५.१ शाळांमध्ये तयार करण्यात आलेल्या गटांच्या सहाय्याने या योजनेचे काम होणार असल्याने हे गट विशेष महत्वाचे आहेत. या गटांमार्फत शाळा, स्थानिक लोक, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याशी संवाद साधला जाईल.

५.२ या योजनेअंतर्गत उपक्रम राबविण्यासाठी, शाळेतील नियमीत वेळापत्रकाव्यतिरिक्त आठवड्यातील कोणत्याही एका दिवसाचे ३ तास देण्यात येतील. यामध्ये वर्गाच्या बाहेरील कृती शिक्षणाचा फक्त समावेश असेल. यासाठीचा दिवस व वेळ शाळेमार्फत ठरवला जाईल. NCC, Scouts व Guides यांच्या धर्तीवर या योजनेसाठी जागा व वेळ शाळेद्वारे उपलब्ध करुन दिला जाईल.

५.३ शाळेतील गट, गावातील लोक, नेमलेली संस्था, ग्रामसभा इ. यांच्या सहाय्याने स्थानिक गरजेनुसार पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम ठरवून, त्याचा आराखडा तयार करुन तो राबवतील.

५.४ शाळेतील / महाविद्यालयातील मुला-मुलींना या योजनेत सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

५.५ राष्ट्रीय हरित सेना योजनेतील सहभागी शिक्षक व विद्यार्थ्यांना, या योजनेत नाव नोंदवता येणार नाही. तसेच पर्यावरण सेवा योजनेतील सहभागी शिक्षक व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय हरित सेना योजनेत नाव नोंदविता येणार नाही.

५.६ शाळांमध्ये या योजनेअंतर्गत गट स्थापन करणे, उपक्रम राबविणे ही कामे, योजनाप्रमुख, शाळेच्या / महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांच्या मदतीने व मार्गदर्शनाने करेल.

५.७ जिल्हा समन्वयकाच्या सूचनांनुसार व योजनेच्या मार्गदर्शक सूचीनुसार योजनाप्रमुख योजनेची कार्यवाही करतील.

५.८ योजनेअंतर्गत उपक्रमांचा आराखडा बनविणे, उपक्रम राबविणे याबाबत मुलांना मदत करणे,त्यांचे मूल्यमापन करुन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे ही योजनाप्रमुखाची महत्वाची जबाबदारी असेल.

५.९ या योजनेअंतर्गत योजनाप्रमुखाने आयोजक, शिक्षक, समन्वयक, पर्यवेक्षक, प्रशासक व जनसंपर्क अधिकारी या सर्व भूमिका पार पाडणे अपेक्षित आहे. जेणेकरुन या योजनेचा प्रसार व प्रचार होण्यास मदत होईल.

५.१० एकदा तयार करण्यात आलेल्या गटासाठी या योजनेचा कालावधी २ वर्षे असेल व या कालावधीत ५ ते १० दिवसांचे किमान २ कॅम्प / शिबीरे घेण्यात येतील. स्थानिक समस्यांवर काम करायचे असल्याने ही शिबीरे तालुक्याच्या / जिल्ह्याच्या हद्दीतच घेतली जातील.

## ६ उपक्रम ठरविणे व शिक्षण साहित्य तयार करणे :-

नेमलेल्या राज्यस्तरीय संनियंत्रण संस्थेची प्रामुख्याने ही जबाबदारी असेल की, नाविन्यपूर्ण प्रगत व अद्ययावत तंत्रज्ञान, चालू असलेली विकासकामे आणि मान्यताप्राप्त तंत्रज्ञान यांसारख्या गोष्टींची माहिती विविध क्षेत्रात कार्यरत संबंधित सरकारी व अशासकीय संस्थांकडून मिळवली जाईल.

राज्यस्तरीय संनियंत्रण संस्था, गावाचा अभ्यास करुन तेथील पर्यावरणीय समस्यांवर आधारित उपक्रमांची आखणी करेल. त्यानुसार वर्षभरात मुलांनी करावयाचे विविध उपक्रम निश्चित केले जातील (short term & long term projects) जसे रोपांची नर्सरी तयार करणे, रोपे तयार करुन ती लावणे आणि कमीतकमी २ ते ३ वर्ष निगा राखणे, त्याची जोपासना व त्या संलग्न उपाययोजना करणे, झाडे जगण्याचे प्रमाण निश्चित करुन ते उद्दिष्ट गाठणे, सेंद्रिय खत बनविणे, बांध घालणे, जलसंधारण, इ.

## ७ उपक्रमांची सर्वसाधारण यादी :-

७.१ स्थानिक संसाधने जसे, माती, पाणी जैवविविधता, आणि ऊर्जा यांच्या सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.

७.२ स्थानिक समस्या जसे, प्रदूषण, कचरा यांवर अभ्यास करणे.

७.३ वरील विषयासंदर्भात तज्ञ मंडळी व स्थानिक विषयांची माहिती असलेल्या लोकांबरोबर चर्चा करणे.

७.४ स्थानिक पातळीवर आवश्यक व स्थानिक लोकांच्या सहभागाने करता येतील असे प्रत्यक्ष कृतीवर आधारीत खालीलप्रमाणे प्रकल्प हाती घेणे अपेक्षित असेल.

- माती व पाणी यांचे संवर्धन व उपाययोजना
- जलस्त्रोतांचे संरक्षण व संवर्धन
- रोपवाटीका निर्माण करणे
- परिसंस्था व जैवविविधता
- सेन्द्रिय शेती संकल्पना
- ऊर्जाबचत संकल्पना
- बायोगॅसचा वापर
- इकोहाऊसिंग संकल्पना
- जैविक इन्धनासाठी झाडे लावणे
- इकोसॅन (इकॉलॉजिकल सॅनिटेशन)
- जैविक खत निर्मिती व वापर
- सांडपाणी व्यवस्थापन आणि पुनर्वापर
- घनकचरा व्यवस्थापन व उर्जा निर्मिती
- हरितशाळा व शाळेतील पाणी व स्वच्छतेबद्दल सुधारणा
- इकोव्हिलेज / इकोसिटी

घर तेथे झाड, गावरान, वनराई, रस्त्याच्या लगत हरितपट्टा विकसित करणे, परसबाग, स्मृतीवने, आयुर्वेदीक वनस्पती (Herbal & Aromatic Plants) उद्यान इ.

८. शाळांना या योजनेंतर्गत निधी खालीलप्रमाणे देण्यात येईल :-

राज्य शासनाने या योजनेमध्ये सहभाग शालेय योजनेत प्रस्तावित कामासाठी तसेच या योजनेंतर्गत इतर कामासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरमहा रु. १५०/- असा निधी राज्य संनियंत्रण संस्थेमार्फत दिला जाईल. शाळेला मिळालेला निधी शाळेने या योजनेच्या नावाने स्वतंत्र बँक खाते उघडून त्यात ठेवणे आवश्यक असेल.

९. योजना प्रमुखाची नियुक्ती, कार्ये, व योजनेसाठी शासनाने घालून दिलेल्या निकषाप्रमाणे यशस्वीरित्या पार पाडण्याची जबाबदारी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांची असेल. संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्यांनी राज्य संनियंत्रण संस्थेला, जिल्हा शिक्षण अधिकारी यांना प्रगतीचा मासिक अहवाल प्रत्येक महिन्याला पाठविणे बंधनकारक असेल. योजनेची अंमलबजावणी करताना शासनाचा निर्णय क्र. इएनव्ही २०१०/प्र.क्र.८/तां.क.३ दि. १४-१-२०१० च्या अटींचे अनुपालन होईल याची दक्षता संबंधित प्रभारी संचालक, राज्य संनियंत्रण संस्था यांनी घेणे बंधनकारक असेल.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर WWW.maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१११००११७०१४५००१ असा आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वल्सा आर.नायर सिंह)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव,नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई,
विभागीय आयुक्त,
जिल्हाधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
शिक्षण संचालक,

सहाय्यक शिक्षण उपसंचालक,
संबंधित शिक्षणाधिकारी (सर्व जिल्हे),
कार्यक्रम संचालक, पर्यावरण शिक्षण केंद्र, (CEE) पुणे,
या कार्यक्रमाखाली निवडण्यात आलेलेले सर्व शाळांचे मुख्याध्यापक/प्राचार्य,
या कार्यक्रमाखाली निवडण्यात आलेल्या अशासकीय संस्था प्रमुख,
सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महा-१ व महा-२-मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग (अर्थ-५/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई,
पर्यावरण विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती.

शासन निर्णय पर्यावरण विभाग क्र.इएनव्ही-२०१०/प्र.क्र.८/तां.क.३, दिनांक २९ सप्टेंबर, २०११ सोबतचे सहपत्र

प्रपत्र - अ

पर्यावरण सेवा योजने अंतर्गत शासन निर्णयात नमूद केलेले निकष पूर्ण करणाऱ्या शाळांची निवड यादी

| अ. क्र. | विभाग | जिल्हा | तालुका | शाळेचा तपशिल | इयत्ता (तुलनेत ७ ते १२ इयत्ता) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | पुणे | हवेली | कै.सुंदराबाई राठी प्रशाला ६१३/६१४, लक्ष्मी रोड, हुजूरपागा हायस्कूल समोर, आझाद क्लॉथ शेजारी ०२०-२४४५१०७६. | ५वी ते १२ वी |
| २ | पुणे | पुणे | पुरंदर | श्रीदत्त शिक्षण संस्था सासवडचे हुतात्मा उमाजी नाईक हायस्कूल,भिवडी, पुरंदर, पुणे-४१२३०१. | ५वी-१०वी |
| ३ | पुणे | पुणे | पुरंदर | पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री कानिफनाथ विद्यालय, भिवडी-४१२३०१ | ५वी ते १०वी |
| ४ | पुणे | पुणे | हवेली | राधाभाई हार्डीकर प्राणिजात मंडळ यांचे सुमती बालवन कात्रज, पुणे. | ५वी ते १० वी |
| ५ | पुणे | सोलापूर | उत्तर-सोलापूर | यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे जी.बी. घोडके विद्यालय, मु. पो. नान्नज | ५ वी ते १०वी |
| ६ | पुणे | सोलापूर | उत्तर-सोलापूर | श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळाचे सावित्री कन्या प्रशाला, रानम्हसले - ४१३२२२ | ८वी ते १०वी |
| ७ | पुणे | सोलापूर | उत्तर-सोलापूर | श्री ब्रम्हगायित्री शिक्षण प्रसारक संस्थेचे श्री ब्रम्हगायित्री विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय-४१३२२२ | ५ वी ते १२वी |
| ८ | पुणे | सोलापूर | मोहोळ | बाल संस्कार केंद्र सोलापूरचे माध्यमिक आश्रम प्रशाळा, लांबोटी- ४१३२१३ | ५वी ते १०वी |
| ९ | पुणे | सोलापूर | उत्तर-सोलापूर | भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे न्यू हायस्कूल, वडाळा-४१३२२२ | ५वी ते १२वी |
| १० | नागपूर | चंद्रपूर | चंदपूर | संतोषी महिला मंडळाचे अमर शहिद विर भगत सिंग हिंदी माध्यमिक विद्यालय, बायपास रोड, बंगाली कॅम्प, चंद्रपूर-४४२४०१. | ८वी ते १०वी |
| ११ | नागपूर | चंद्रपूर | चंद्रपूर | महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ यांचे पॅरामाऊंट कॉन्व्हेंट बाबूपेठ चंद्रपूर -४४२४०३ | ८वी ते १०वी |
| १२ | नागपूर | चंद्रपूर | चंद्रपूर | सर्व सेवा शिक्षण प्रसारक मंडळ यांचे सावित्रीबाई फुले विद्यालय जुनोना | ८वी ते १०वी |
| १३ | नागपूर | चंद्रपूर | चंद्रपूर | चांदा शिक्षण मंडळाचे सिटी कन्या विद्यालय, चंद्रपूर. | ५वी ते १०वी |
| १४ | नागपूर | चंद्रपूर | चंद्रपूर | श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था, गडचिरोलीचे डॉ. पंजाबराव देशमुख विद्यालय, चंद्रपूर (वडगांव). | ५वी ते १० वी |
| १५ | नागपूर | नागपूर | नागपूर | सुरेंद्रगड हिंदी माध्यमिक शाळा, महात्मा गांधी नगर, सेमिनारी हिल्स | ५वी ते १०वी |
| १६ | नागपूर | नागपूर | नागपूर | लोक शिक्षण संस्थेची देवसमृती लोकांची शाळा शिरसपेठ, नागपूर-४४०००९ | ८वी ते १२ वी |
| १७ | नागपूर | नागपूर | रामटेक | विश्व हिंदु जनकल्याण परिषद, विदर्भ-नागपूर यांची गुरुकूल माध्यमिक आश्रमशाळा, देवलापार ता.रामटेक, जिल्हा नागपूर | ८ वी ते १०वी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | नागपूर | नागपूर | नागपूर | सोमलवार शिक्षण संस्थेचे सोमलवार हायस्कूल, खामला, नागपूर-२५ | ५वी ते १२वी |
| १९ | औरंगाबाद | औरंगाबाद | औरंगाबाद | हरसिध्दी शिक्षण संस्थेचे न्यू धारेश्वर हायस्कूल, साताळा, पो. चौका, ता.जि. औरंगाबाद-४३१००८ | ८वी ते १०वी |
| २० | औरंगाबाद | औरंगाबाद | औरंगाबाद | राजर्षी शाहू शिक्षण व ग्रामोद्योग संस्थेखे् आर्य चाणक्य विद्याधाम,जतवाडा, औरंगाबाद | ५वी ते १०वी |
| २१ | औरंगाबाद | औरंगाबाद | फुलंब्री | पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे श्री संत सावता गुरुकूल माध्यमिक विभाग, ता.फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद | ५वी ते १०वी |
| २२ | औरंगाबाद | औरंगाबाद | औरंगाबाद | जय महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्थेची राजे संभाजी भोसले सैनिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, कांचनवाडी, पैठण रोड, औरंगाबाद-४३१००५ | ५वी ते १२वी |
| २३ | औरंगाबाद | जालना | जालना | कैलासवासी यमुनाबाई पाटील शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक मंडळ यांचे अभिजित विद्यालय, नेर, तालुका जालना-४३१२०३ | ५वी ते १०वी |
| २४ | औरंगाबाद | जालना | जालना | ज्ञानज्योत शिक्षण संस्था यांचे ज्ञानज्योत माध्यमिक विद्यालय, योगेशनगर, अंबड नाका, जालना-४३१२०३ | ५वी ते १०वी |
| २५ | औरंगाबाद | जालना | जालना | बहुजन नायक शिक्षण प्रसारक मंडळ यांचे रुक्मिणी केंद्रिय प्राथमिक व माध्यमिक निवासी शाळा, रामनगर. | ५वी ते १०वी |
| २६ | औरंगाबाद | जालना | जालना | जिल्हा परिषद प्रशाला, सेवली तालुका-जि.-जालना | ५वी ते १०वी |
| २७ | अमरावती | अमरावती | मोर्शी | श्री विवेकानंद सेवा संघ यांचे श्री विवेकानंद विद्या मंदिर, शिरखेड, तालुका मोर्शी, जिल्हा अमरावती- ४४४७२६ | ५वी ते १०वी |
| २८ | अमरावती | अमरावती | अमरावती | जीवन विकास शिक्षण संस्थेचे प्रगती विद्यालय, राहाटगांव, ता.जि. अमरावती-४४४६०२ | ५वी ते १०वी |
| २९ | अमरावती | अमरावती | अमरावती | लोक शिक्षण संस्थेचे श्रीराम विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, वडाळी नाक्याजवळ, अमरावती-४४४६०२ | ५वी ते १२वी |
| ३० | अमरावती | अमरावती | अमरावती | राजे संभाजी महाराज शिक्षण संस्थेचे माध्यमिक विद्यालयय मासोद, मौ.पो. वडगांव, ता.जि. अमरावती-४४४७०१ | ८वी ते १०वी |
| ३१ | अमरावती | यवतमाळ | नेर | ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ यांचे रमाई प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आदिवासी आश्रमशाळा, बानगांव, ता. नेर, जि. यवतमाळ | ५ वी ते १२वी |
| ३२ | अमरावती | यवतमाळ | यवतमाळ | गुरुकृपा शिक्षण प्रसारक मंडळ यांचे स्वर्गीय रामजी चन्नावार विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, गजानन सोसायटी, सिंघानिया नगर, यवतमाळ-४४५००१ | ८वी ते १२वी |
| ३३ | अमरावती | यवतमाळ | केळापूर | छत्रपती शिवाजी प्रतिष्ठान यांचे छ. शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मोहदा-४४५३२३ | ५वी ते १२वी |
| ३४ | अमरावती | यवतमाळ | घाटंजी | पारवा शिक्षण संस्थेचे आबासाहेब देशमुख पारवेकर माध्यमिक आश्रमशाळा पो.राजूरवाडी, घाटंजी. | ८ वी ते १०वी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३५ | नाशिक | नाशिक | सटाणा | रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, आसखेडा, ता.सटाणा, नाशिक-४२३३०३ | ५वी ते १२वी |
| ३६ | नाशिक | नाशिक | दिंडोरी | नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज यांचे जनता विद्यालय कोऱ्हाटे, ता. दिंडोरी-४२२२०६ | ५वी ते १०वी |
| ३७ | नाशिक | नाशिक | दिंडोरी | मा. यशवंतराव पाटील एज्युकेशन सोसायटी नाशिक यांचे महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय, देवठाण, दिंडोरी-४२२२०२ | ८वी ते १०वी |
| ३८ | नाशिक | नाशिक | दिंडोरी | निफाड तालुका एज्युकेशन सोसायटी यांचे चिंचखेड हायस्कूल, चिंचखेड, ता. दिंडोरी-४२२२०९ | ८वी ते १०वी |
| ३९ | नाशिक | जळगांव | रावेर | भगवती परिसर उन्नती मंडळाचे भाईसो राजाराम गणू महाजन आदिवासी माध्यमिक विद्यालय, मौ.पो. आभाडे, तालुका रावेर, जळगांव-४२५५०८ | ५वी ते १० वी |
| ४० | नाशिक | जळगांव | चोपडा | गुळी नदी परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे गुळी माध्यमिक विद्यालय,मु. माचले, पो.तावसे, ता.चोपडा-४२५१०७. | ५वी ते १०वी |
| ४१ | नाशिक | जळगांव | चोपडा | नूतन शिक्षण प्रसारक मंडळाचे सी.बी.निकुंभ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, घोडगांव ४१५१०८ | ५वी ते १२वी |
| ४२ | नाशिक | जळगांव | चोपडा | बनाबाई गगडाणी ट्रस्ट अडावदचे नूतन ज्ञानमंदिर अडावद ता. चोपडा, जिल्हा जळगांव-४२५३०३ | ५वी ते १२वी |
| ४३ | कोकण | रत्नागिरी | लांजा | गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठान यांची माध्यमिक आश्रमशाळा कुवे पनाळे, तालुका लांजा, जि. रत्नागिरी-४१६७०१ | ५वी ते १०वी |
| ४४ | कोकण | रत्नागिरी | लांजा | सांगरुळ शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल, वनगुळे तालुका लांजा, जि. रत्नागिरी | ८वी ते १०वी |
| ४५ | कोकण | रत्नागिरी | राजापूर | सहयाद्री शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल, सोलगाव, ता. राजापूर. जि. रत्नागिरी | ८वी ते १०वी |
| ४६ | कोकण | रत्नागिरी | लांजा | मोहम्मदिया एज्युकेशन ट्रस्टचे अलअमिन उर्दू हायस्कूल, लांजा, मौ.पो.लांजा, तालुका लांजा, रत्नागिरी-४१६७०१ | ८वी ते १०वी |
| ४७ | कोकण | ठाणे | कल्याण | डॉ.सारंगधर चॅरिटेबल ट्रस्ट कल्याणचे शशांक माध्यमिक विद्यालय, कल्याण | ५वी ते १०वी |
| ४८ | कोकण | ठाणे | कल्याण | शिशु विकास शिक्षण संस्थेचे माध्यमिक विद्यालय, आंबेडकर रोड, कल्याण पश्चिम-४२१३०१ | ५वी ते १०वी |
| ४९ | कोकण | ठाणे | कल्याण | एज्युकेशनल अपलिफ्ट सोसायटीचे नॅशनल उर्दू हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, आग्रा रोड, कल्याण | ५वी ते १०वी |
| ५० | कोकण | ठाणे | कल्याण | बालक मंदिर संस्थेचे ओक हायस्कूल, कल्याण-४२१३०१ | ५वी ते १०वी |

(वल्सा आर.नायर सिंह)

सचिव, महाराष्ट्र शासन

**शासन निर्णय पर्यावरण विभाग क्र.इएनव्ही-२०१०/प्र.क्र.८/तां.क.३, दिनांक २९ सप्टेंबर, २०११ सोबतचे सहपत्र**

**प्रपत्र - ब**

**पर्यावरण सेवा योजने अंतर्गत शासन निर्णयात नमूद केलेले निकष पूर्ण करणाऱ्या अशासकीय संस्थांची निवड यादी**

| अ. क्र. | विभाग | जिल्हा | तालुका | संस्थेचे नांव | पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | नाशिक | मालेगांव | एकता प्रगत अध्ययन संस्था | दुसरा मजला, मराठी शाळा क्र.३, गांधी पुतळयाजवळ, मौसम पूल, मालेगांव. |
| २ | नाशिक | जळगांव | जळगांव | जाणता राजा प्रतिष्ठान | प्लॉट नं.२, चैत्रबन कॉलनी, महाबळ, जळगांव |
| ३ | नाशिक | जळगांव | जळगांव | स्कूल ऑफ एन्व्हायरमेंट प्रोजेक्ट ऑफ समर्पन. | छत्रपती शाहू महाराज कॉम्प्लेक्स, जळगांव |
| ४ | औरंगाबाद | औरंगाबाद | औरंगाबाद | सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ | डॉ. हेगडेवार रुग्णालय, गारखेडा परिसर, औरंगाबाद. |
| ५ | अमरावती | अमरावती | अमरावती | निसर्ग संरक्षण संस्था | प्रतिष्ठा, भारतनगर अकोला राड, साई नगर जवळ, अमरावती. |
| ६ | अमरावती | अमरावती | तिवसा | स्वर्गिय लक्ष्मणराव माहूलकर ग्रामीण मागासवर्गीय बहुदेशिय संस्था | गुरुकुंज आश्रम, ता. तिवसा |
| ७ | अमरावती | यवतमाळ | कळंब | संजिवनी बहुदेशिय शिक्षण संस्था. | मु. पो. पार्डी, ता. कळंब |
| ८ | अमरावती | यवतमाळ | घाटंजी | श्री नवशक्ती बहुदेशिय ग्रामीण विकास संस्था, अंजी | मुक्काम पोस्ट अंजी, ता. घाटंजी, यवतमाळ. |
| ९ | अमरावती | यवतमाळ | यवतमाळ | जय तुळजाई ग्रामीण बहुदेशिय स्वयंसेवी संस्था | मु.पो. शिवनगर, उमरसरा. |
| १० | नागपूर | चंद्रपूर | ब्रम्हपुरी | फुले आंबेडकर बहुद्देशिय ग्रामीण विकास शिक्षण संस्था. | मुक्काम पोस्ट मेंडकी, ता. ब्रम्हपुरी. |
| ११ | नागपूर | चंद्रपूर | मूल | स्वावलंबी बहुदेशिय पर्यावरण संरक्षण सेवा समिती | गांधी चौक, सोमनाथ रोड, मूल. |
| १२ | नागपूर | नागपूर | नागपूर | निसर्ग विज्ञान मंडळ, नागपूर | १३८, कल्पतरु, महालक्ष्मीनगर नं.२, मानेवाडा रोड, नागपूर-४४००२४. |
| १३ | कोंकण | ठाणे | ठाणे | पर्यावरण दक्षता मंच | ठाणे |
| १४ | कोंकण | रत्नागिरी | लांजा | भारतीय कष्टकरी रयत सेवा संस्था. | मु.पो.कोंडये, ता. लांजा |
| १५ | पुणे | पुणे | पुणे | राज्य संनियंत्रण संस्था जिल्हा संस्थेची भूमिका पार पाडेल | |

(वल्सा आर.नायर सिंह)

सचिव, महाराष्ट्र शासन